# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२२१/प्र.क्र.१७/सीईटी/२०६९ दिनांक - ०७/१२/२०२१.

## महत्वाची सूचना

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रवेश घेणाऱ्या तंत्रशिक्षणांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या उमेदवारांसाठी व अर्ज स्वीकृती केंद्र आणि सर्व संस्था यांच्याकरीता**

संदर्भ - शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८८/तांशि-४, दिनांक ०७ डिसेंबर, २०२१.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रवेश घेणाऱ्या पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थी व पालक यांच्याकडून प्राप्त झालेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी EWS, NCL आणि CVC/ TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी पावती सादर केली होती, **अशा सर्व उमेदवारांना संबंधीत अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम फेरीत त्या-त्या राखीव प्रवर्गातून गुणवत्तेनुसार जागा वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच द्वितीय फेरीत सुध्दा त्या-त्या राखीव प्रवर्गातून जागा वाटप करण्यात येतील.** अशा उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत ज्या प्रवर्गातून जागा वाटप करण्यात आलेली आहे त्या-त्या प्रवर्गातून EWS, NCL आणि CVC/ TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाईन अपलोड केलेल्या पावतीच्या आधारे संस्थेत प्रवेश निश्चित करण्यात येईल. सदरचा प्रवेश हा तात्पूरता प्रवेश म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**संबंधीत अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची निर्धारीत करण्यात आलेल्या <u>द्वितीय फेरी प्रवेश निश्चितीच्या अंतिम दिनांकाच्या आत</u> संबंधीत उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे (EWS, NCL आणि CVC/ TVC) सादर करणे बंधनकारक राहील.** अन्यथा अशा दोन्ही फेरीमध्ये संस्थेत प्रवेश निश्चित केलेल्या उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील. तद्नंतर असे उमेदवार उर्वरीत संस्थास्तरावरील फेरीसाठी खुला प्रवर्गातून प्रवेश घेण्यास पात्र राहतील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**